
# गीतदत्तात्रेय

सुधांशु



ठाणे
आवक क्र. : ९८८५
काव्य
९८८५
REFBK-0014805
REFBK-0014805

# गीत दत्तात्रेय

सुधांशु

ज्ञानराज प्रकाशन
पुणे २

साडेतीन रुपये

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४८०५

REFBK-0014805
REFBK-0014805

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रंथालय
समृद्धी योजना
१९७०

प्रकाशक

अशोक महादेव जोशी
ज्ञानराज प्रकाशन
४२१ शनिवार पेठ, पुणे २

मुखपृष्ठ

सुधाकर खासगीवाले

अंतर्गत सजावट

मय्यासाहेब ओंकार

ठसे

ब. शं. दाते
कलाभुवन, पुणे २

प्रकाशनतिथी


दत्तजयंती
८ डिसेंबर १९६५

मुद्रक

वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय प्रा. लि.
४०५ नारायण पेठ, पुणे २

सर्वहक्क लेखकाधीन.

'गीत दत्तात्रेय'चे कार्यक्रम श्री. ह. न. जोशी, ऊर्फ सुधांशु सुधांशु सदन, औदुंबर यांच्या लेखी परवानगीशिवाय कोणीही करू नयेत




ज्यांच्या करुणेच्या सिंचनाने

माझी जीवनवेली फुलली

त्या

श्रीदत्तगुरुचरणी

- कौमुदी [ काव्य ]
- विजयिनी [ काव्य ]
- जलवंती [ काव्य ]
- उगवते तारे [ सं. काव्य ]
- दत्तजन्म [ संगीतिका ]
- गीतसुगंध [ भावगीत ]
- गीतसुवर्ण [ भावगीत ]
- गीतसुधा [ भावगीत ]
- गीतसुषमा [ भावगीत ]
- श्रीदत्तगीते [ भक्तिगीत ]
- कालिंदीकाठी [ गौळणी ]
- ने. स्वातंत्र्यसंग्राम [ पोवाडा ]
- चतुरादेवी [ बालकथा ]
- सुभाषकथा [ बालकथा ]
- खडकातील झरे [ लघुकथा ]
- गीतदत्तात्रेय [ दत्तकथागीत ]

## सुधांशु-साहित्य

# नम्र निवेदन

श्रीदत्तगुरूंचे जीवन ही एक अमर जीवनगाथा आहे. ती एक अथांग आणि अपार जीवनगंगा आहे. तीरावरचा परिसर फुलवीत ती अखंड वाहात आहे. तिचे दर्शन पापहरक आहे, जन्ममृत्युमारक आहे.

या समर्थ जीवनाचे दर्शन मी कोण घडविणार ? माझी ती शक्ती नाही. ही एक सेवा आहे. दत्तगुरूंनीच ती करून घेतली आहे. गंगेचे जीवन ओंजळीं भरून गंगेलाच वाहिले आहे.

श्रीदत्तगुरूंचे चरित्र गीतरूपाने लिहावे-अशी गीत-पुष्पे श्रीदत्तगुरूंच्या चरणी वहावी-अशी प्रथम प्रेरणा दिली श्रीक्षेत्र औदुंबर येथील दत्तभक्त योगी श्री प. प. नारायणानंदतीर्थ स्वामी महाराज यांनी. त्यांची आज्ञा मला शिरसामान्य होती. मीही एक दत्तोपासक होतो. गीतरूपाने दत्तोपासना करण्याचा मला छंद होता. हा छंद लावला होता माझ्या जन्मदात्या माउलीनं आणि श्रीकृष्णेनं. मला कवीच बनविलं होतं मुळीं या दोन मातांनी ! एक जन्मदात्री माउली आणि दुसरी कृष्णामाता. एकीच्या शब्दाशब्दांतून जे ओवी-अभंगांचे मोती झरत, त्याच भूषणांनी मला माझ्या काव्यदेवतेची पूजा बांधता आली. आणि कृष्णेच्या परिसरातील सौंदर्यानं-रमणीयतेनं-पावित्र्यानं मला काव्यदृष्टी लाभली. या दोघींमुळेच भावगीतांपेक्षा भक्तिगीतेच

माझ्या काव्यशक्तीने अधिक निर्मिली. 'दत्त दिगंबर दैवत माझे', 'गुरुदत्त पहिले कृष्णातीरी', 'दत्तगुरू सुखधाम' अशी काही गीतपुष्पे यापूर्वीच मी श्रीदत्तगुरुचरणी वाहिली होती व ती प्रसादरूपाने घरोघर पोचलीही होती. ही नवी सेवाही मी हौसेने अंगीकारली. याच वेळीं मुंबई-रत्नागिरी या भागातून दत्तचरित्र मी गीतातून लिहावे, अशी एक दोन सूचनापत्रे आली होती. माझे गायकमित्र सांगलीचे श्री. बाळ कारंजकर हेही याच वेळीं मला म्हणाले, " अशी एक गीतमाला रचा आणि मला गायला द्या की, त्यांत एखादं महान जीवनदर्शन घडावं आणि कवीचं-गायकाचं-आणि श्रोत्यांचंही जीवन कृतार्थ व्हावं."

मग मी थोडक्यात सुबोध असं दत्ताचं जीवनचरित्र गीतांतून लिहिलं. यांत श्रीपाद श्रीवल्लभ व श्रीनृसिंहसरस्वती या दत्तावतारांच्या प्रशांत जीवनरेखा आहेत. श्रीदत्तावताराबद्दल मला बालपणापासूनच आकर्षण आहे. या अमर अवताराचें रहस्य, मला तर चराचर सृष्टीच्या मांगल्याचं-कल्याणाचं रहस्यच वाटतं. त्यागशील, विरागी, पण समर्थ असं हे जीवन म्हणजे मानवी जीवनाचं एक चैतन्यस्वरूप आहे. सृष्टीच्या उत्पत्तिस्थितिलयाचं विशाल कर्तृत्व असणारा, इच्छामात्रे अतर्क्य गोष्टी घडविणारा, विश्वाचं गुरुस्थान भूषविणारा हा महापुरुष दिगंबर राहतो. योग आणि विरक्ती यांच्या भूषणांनी नटतो. त्रिभुवनात संचार करतो आणि ज्ञान-वैराग्य-तप यांचा पवित्र परिमल चराचर सृष्टीत दर्वळत ठेवतो. ही दत्तगुरूची भव्य, दिव्य जीवनधारा मला नेहमीच मोहविते. या विशाल जीवनाचं अल्पसं दर्शन गीतरूपानं घडविता आलं, तर माझ्या कवित्वाचं सार्थक होईल, अशी तळमळ मला लागून राहिली होती.

काव्यातून-संगीतातून श्रीगुरूंची सेवा घडावी, या इच्छेने माझ्या मनाची शांती हरपली. आणि मीएकामागून एक गीते रचू लागलो. गीत तयार होई तसतसे ते श्री. बाळ कारंजकर

नेऊ लागले. त्याला चाली लावू लागले. श्रेयाचे भागीदार होऊ लागले. माझा गर्व थोडा उतरला. मी कार्याचा अर्धा भार उचलू शकत होतो. संपूर्ण भार उचलण्याचे बळ माझ्यात नव्हते. मला गाता येत नव्हते, याची खंत वाटू लागली. मात्र कारंजकरांचा प्रेमळ भाव आगळा. कवी आणि गायक यांतलं द्वैत त्यांनी आपल्या प्रेमळ वृत्तीनं नाहीसं केलं.

या साली अधिकमास होता. श्रीक्षेत्र औदुंबरी दत्तगुरुचरणी अनेक भाविक भक्त तीस-तीन पदार्थांची वायने देत होते. मी ठरवलं, तीस-तीन गीतांची मालाच श्रीदत्तगुरूंच्या कंठी घालावी. म्हणून तेहतीस गीतपुष्पांची ही माला मी गुंफली.

श्रीक्षेत्र औदुंबरी श्रीनारायणानंद स्वामी महाराज यांच्या उपस्थितीत या गीतपुष्पांनी दत्तगुरूंची पहिली पूजा बांधली. श्रीस्वामीजी जराजर्जर होते. त्यांना बसवत नव्हते. फक्त आशीर्वाद देऊन–एकदोन गीते ऐकून ते उठणार होते. पण ते बसले. तीन साडेतीन तास बसले. “ आपणास सोसणार नाही. आपण उठावं, ” अशी मी सूचना केली तरी बसले. मला उत्तर देण्याच्याही मनःस्थितीत ते नव्हते. ते दत्तचरित्रात रंगून गेले होते. एकाग्र झाले होते. त्या अनुभवाने मी धन्य झालो. त्यांनी मला, गायक श्री. बाळ कारंजकर यांना व तबलासाथीदार श्री. शिवप्रताप सारडा यांना शुभाशीर्वाद दिले आणि सांगितले, “ तुम्ही वायू व्हा आणि हा दत्तचरित्राचा सुगंध जगात पोचवा. ”

आम्ही त्या आशीर्वादाने भारावलो आणि कृपेचा भार शिरी घेऊन बसलो. त्यानंतर तासगावी डॉ. सोनटक्के, डॉ. परचुरे श्री. गुळवणीबुवा व भिलवडीस श्री. बाबासाहेब चितळे, डॉ. चंद्राबाई शेणोलीकर यांनी छोटे कार्यक्रम घडविले. मिरजेस श्री. अण्णाबुवा यांच्या मठातही आम्ही गायनसेवा रुजू केली. पण मोठा कार्यक्रम झाला तो पुण्याच्या भारतगायनसमाजात. पुण्याचे

एक वजनदार नागरिक व भाविक दत्तभक्त श्रीमंत सरदार आबासाहेब मुजुमदार यांनी खास निमंत्रण देऊन हा योग घडवून आणला. श्री. अप्पासाहेब इनामदार यांनी त्याला साथ दिली. भारतगायन-समाजाच्या चालकांनी आपुलकीने व्यवस्था ठेवली. मा. कृष्णराव, श्री. मारूलकर बुवा, श्री. कडलासकरबुवा, सौ. संजीवनी खेर इत्यादि संगीतज्ञ मंडळी व पं. महादेवशास्त्री जोशी, श्री. भा. द. खेर इत्यादि साहित्यिक व रसिक यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम रंगला. श्री. बाळ कारंजकरच गायक होते. तबलासाथ केली श्री. रामभाऊ चिपळूणकर यांनी. या वेळी श्रीमंत आबासाहेब मुजुमदार म्हणाले, "आम्हा दत्तोपासकांना ही गीतमाला म्हणजे अनुग्रहच." मा. कृष्णराव यांनी कवीची व गायकाची प्रेमाने पाठ थोपटली. पं. महादेवशास्त्री यांनी काव्यगुणांचे कौतुक केले. श्री. खेर यांनी वृत्तपत्रांतून गौरविले. डॉ. सौ. कमलाबाई चितळे यांनी घरी बोलावून सत्कार केला. अशा प्रकारे पुण्याच्या कार्यक्रमाने ईप्सितसिद्धीचा अंकुर दिसला. आशा मोहरली. पुढेही सातारा, किर्लोस्करवाडी, पलूस, सांगली, कोल्हापूर येथे हे दत्तचरित्र-गायनाचे कार्यक्रम झाले व ते रसिकांना आवडले.

मग असे वाटले, की आपले इच्छित साध्य होत आहे. इच्छित असे, की श्रीदत्तगुरुचरित्र सर्वांना कळावे. श्रीदत्तकृपेचा प्रसाद सर्वांना मिळावा. दत्तमाहात्म्य हा ग्रंथ पू. श्रीटेंबेस्वामीजींनी मराठीत रचला, पण तोही बहुतांना अपरिचितच. गुरुचरित्र हा ग्रंथ काही सांप्रदायिक वाचतात; पण त्याला बंधने फार. नियम पाळण्यास कठीण. अशा अवघड मार्गाकडे कोण वळतो? म्हणून ही गीतमाला रचिली.

या गीतमालेचे गायक श्री. बाळ कारंजकर, त्यांना तबला-साथीची जोड देणारे श्री. शिवप्रताप सारडा व श्री. रामभाऊ चिपळूणकर, तिचे कौतुक करणारे पं. महादेवशास्त्री जोशी,

सर्वश्री. आबासाहेब मुजुमदार, मारूलकरबुवा, कडलासकरबुवा, अप्पासाहेब इनामदार, डॉ. कमलाबाई चितळे, डॉ. चंद्राताई शेणोलीकर, बाबासाहेब चितळे, दत्तोपंत आपटे, तसेच या गीतमालेला सुबक आवरणातून घरोघर पोचविणारे ज्ञानराज प्रकाशनाचे श्री. अशोक जोशी, या सर्व श्रेष्ठांचे व सुहृदांचे आभार मानून त्यांचे ऋण फिटण्यासारखे नाही. ते डोई वागविण्यातच मी धन्य आहे.

ही श्रीदत्तचरित-गीतमाला जर रसिकांना आवडली, काहींनी ती भाविकपणे गाऊन जर श्रीगुरूंची सेवा केली आणि ती श्रवण करून जर काहींना मनःशांती लाभली, तरी मी स्वतःला धन्य समजेन.

रसिकांचा व दत्तभक्तांचा विनम्र

सुधांशु-सदन
औदुंबर, जि. सांगली.

—सुधांशु

# पुरस्कार

कवी सुधांशु हे श्रीक्षेत्र औदुंबर येथील रहिवासी. दत्त-भक्ती परंपरेने त्यांच्या घरात चालत आलेली आहे. सुधांशूनाही तो वारसा आहेच. विशेष म्हणजे त्यांच्या दत्तभक्तीला प्रतिभेचे कोंदण लाभले आणि ती प्रस्तुत 'गीतदत्तात्रेया'च्या रूपाने भावफुली फुलून आली.

श्री. सुधांशु हे भावकवी आहेत. त्यांच्या कवितांचे संग्रहही प्रकाशित झाले आहेत. कृष्णमाईचा त्यांना अविच्छिन्न सहवास घडत आहे. त्या भागातला कृष्णेचा परिसर त्यांनी कवीच्या नजरेने न्याहाळून शब्दबद्ध केला आहे. आपल्या अंतरातले भाव कृष्णेच्या प्रवाहात न्हाणून त्यांनी हृद्य केले असल्याचा प्रत्यय त्यांच्या कित्येक भावगीतांतून मिळतो. औदुंबर हे नावाजते क्षेत्र असले, तरी वाङ्मयनिर्मितीला ते फारसे अनुकूल नाही. अशाही स्थितीत कवी सुधांशु हे त्याच ठिकाणी आपली वाङ्मय-साधना सतत करीत राहिले आहेत, हे विशेषच म्हटले पाहिजे.

प्रस्तुत गीतदत्तात्रेय या संग्रहातली बहुतेक सर्व गीते ही चरित्रगीते आहेत. श्रीपाद श्रीवल्लभ आणि नरसिंह सरस्वती या दोन अलौकिक दत्तावतारांच्या चरित्रांवर आणि लोकोद्धारक कार्यावर या गीतांची रचना केलेली आहे. त्या अनुरोधाने नरसोबाची वाडी, औदुंबर आणि गाणगापूर या तीन प्रमुख

दत्तक्षेत्रांशी या गीतांचा संबंध आला आहे. रसानुकूल अशा विविध गेय चालींवर या गीतांची रचना झालेली आहे. ही काव्यरचना करताना 'गीत रामायणा'चा आदर्श त्यांनी डोळ्यांपुढे ठेवलेला दिसतो. त्यांच्या या कवितेत प्रसाद आहे, लालित्य आहे आणि भक्तीची आर्द्रताही आहे.


दत्तभक्ती हे खास करून महाराष्ट्राला मिळालेले वरदान आहे. प्रमुख दत्तक्षेत्रेही महाराष्ट्रातच आहेत. इथे अनेक घरांतून गुरुचरित्राचा यथाशक्ती नित्यपाठ चालतो. गुरुचरित्राची पारायणे आणि सप्ताहही होतात. महाराष्ट्रातल्या या दत्तोपासनेला प्रस्तुत पुस्तकाच्या रूपाने ललित मधुर अशी नवी जोड मिळाली आहे, असे म्हणायला हरकत नाही.

दत्तगुरूंच्या पारायणसेवेनंतर भजनसेवेसाठी भाविकांना हे पुस्तक उपयुक्त ठरेल, यात संदेह नाही.

पुणे
दत्तजयंती — महादेवशास्त्री जोशी
शके १८८७




श्री दत्त महापूजा
श्रीक्षेत्र औदुंबर




श्री दत्त पादुका

श्रीक्षेत्र औदुंबर



एकमुखी षड्भुज दत्त

त्रिप्रमठ, पंढरपूर




एकमुखी षड्भुज दत्त

भटजीबुवांच्या मठामागे, नाशिक



श्री नृसिंह सरस्वती
श्रीक्षेत्र कारंजे येथील मूर्ती



श्री अक्कलकोटकर स्वामी



श्री माणिक प्रभू

# गीत दत्तात्रेय

सुधांशु



१

" दत्त दिगंबर दैवत माझे " हे महाराष्ट्रातील दत्तभक्तांचे एक उपासनागीत झाले आहे. हे भक्तिगीत कुठूनही, कधीही कानी आले तरी मनुष्याच्या वृत्ती क्षणभर स्थिरावतात. हृदय-सिंहासनावर ' तीन शिरे कर सहा ' अशी हास्यवदन श्रीदत्त-मूर्ती विराजते आणि मग आनंदाश्रू झरतात. हळूहळू मीपण सरते. हे उपासनागीत हेच दत्तगीतमालेचे प्रथम पुष्प !

# दत्त दिगंबर दैवत माझे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
क्र. १४८०५
शाखा (स्थळ प्रत)

दत्त दिगंबर दैवत माझे
हृदयी माझ्या नित्य विराजे !

अनसूयेचे सत्त्व आगळे
तिन्ही देवही झाली बाळे
त्रैमूर्ती अवतार मनोहर दीनोद्धारक त्रिभुवनि गाजे

तीन शिरे, कर सहा शोभती
हास्य मधुर शुभवदनावरती
जटाजूट शिरि पायि खडावा, भस्मविलेपित कांती साजे

पाहुनि प्रेमळ सुंदर मूर्ती
आनंदाचे आसू झरती
सारे सात्त्विक भाव उमलती, हळुहळु सरते मीपण माझे




# २

दत्तभक्ती महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात प्रचलित आहे. दत्तावताराचं वैशिष्ट्य असं–एक तर तो चिरंजीव अवतार आहे अन् शिवाय तो अयोनिसंभव आहे. अनसूयेच्या पातिव्रत्याच्या पुण्याईनं हा अवतार झाला. वैराग्य आणि तप यांच्या तेजानं हा मंगल तारा त्रैलोक्याकाशात अखंड तळपत राहिला आहे. दत्तसंप्रदायाचा प्रमुख ग्रंथ म्हणजे गुरुचरित्र. गुरुचरित्रात सिद्धांनी नामधारकाला दत्तगुरूंचे चरित्र सांगितले, असा उल्लेख आहे. सिद्धांनी कथिलेले श्रीगुरूंचे पावन चरित्र श्रवण करून नामधारक कृतार्थ झाला; पावन झाला. आपणही या दत्तगुरुचरित्रगीताचे गायन करून–ते श्रवण करून पावन होऊ या.

# नामधारका सिध्द सांगती

नामधारका सिद्ध सांगती
श्रीदत्तात्रयकथा सुरस ती !

सिद्धमुनींचे घडता दर्शन
नामधराचे मोहरले मन
मधुपानास्तव घालित रुंजी मधुकर बनुनी सिद्धाभवती

बनुनी जलधर सिद्धमुनीश्वर
दत्तचरितजल वर्षि मधुरतर
तृषित चातका नामधारका – प्राशुनिया ते लाभे तृप्ती

दत्तचरित जणु रम्य तपोवन
नामधारकहि साधक सज्जन
गुरुचरिताचा प्रसाद देउन – सिद्धमुनी त्या पावन करिती

सिद्ध आम्रतरु सुंदर फुलला
नामधारका सुखकर बनला
गुरुचरिताची प्रेमळ पाखर – सिद्धमुनी त्यावरी घालिती

दत्तचरित अमृत सुमधुर अती
सिद्ध मुनी स्वकरेच पाजिती
शिष्यवरा आकंठ प्राशिता – सहजच लाभे समाधिस्थिती

होय तनू रोमांचित पुलकित
योगमग्न तो होई अवचित
पाहुनिया ते दृश्य अलौकिक – सिद्धमुनीही विश्व विसरती





# ३

दत्तावतारात अनसूयेला महत्त्वाचं स्थान आहे. तिच्या पातिव्रत्याच्या पुण्याईनं हा जगदुद्धारक अवतार झाला. स्त्रीच्या महत्तमतेचा ध्वज तिने सह्यगिरीवर अखंड फडकत ठेवला आहे. म्हणून पहिला नम्र प्रणाम त्या साध्वी अनसूयेला. प्रथम जयजयकार तिचा.

# पतिव्रतेच्या पुण्याईने होई जगदुध्दार

पतिव्रतेच्या पुण्याईने होई जगदुद्धार
सतीचा त्रिवार जयजयकार !


प्रशांत, शीतल, रम्य तपोवन
तपस्थान अत्रींचे पावन
अनाहत ध्वनि जिथे निरंतर – करी दिव्य झंकार

अनसूया ती मुनिगृहभूषण
पतिव्रता, सतिधर्मपरायण
जिचिया आज्ञे रविशशि तपती – पवन करी संचार

धरा जियेला झाली मृदुला
अग्नि जिच्यास्तव शीतल बनला
यमही मानी धाक निरंतर - असा जिचा अधिकार

सत्त्व पहाता ज्या साध्वीचे
सत्त्व हरपले देवपतींचे
सतिच्या इच्छामात्रे झाला - दत्तात्रय-अवतार


ONKAR




४

ज्या तपोधन अत्रींच्या आश्रमात ब्रह्मा-विष्णु-महेशांचे दिव्य चरण लागले, जिथे सतीच्या चारित्र्याच्या तेजाने त्रिभुवननेत्र दिपले, तिन्ही देवांच्या बालमूर्तींच्या रुदनस्वरांनी जेथील परिसर सुखावला, त्या आश्रमाला विनम्र अभिवादन. तिथल्या रजःकणांना सहस्रवार वंदन!

# तपोवनि अत्रींचा आश्रम

तपोवनि अत्रींचा आश्रम
मनोहर स्वर्गधरा-संगम !

उषःकाल होताच दिशांतुनि
विहंग रमती मंजुळ गानी
सरोवरी फुलतात कमलिनी – विरुनी जाते तम

तपोवनींच्या पर्णकुटीतुनि
घुमती निर्मल ॐकारध्वनि
पावित्र्याचा सुगंध सुमधुर – दर्वळतो निरुपम

सरोवरी स्नानादि सारुनी
यती चालले तपोधन कुणी
दंड-कमंडलु करी शोभती – सतेज सूर्यासम

इथे भक्तिची फुले उमलती
वेदघोष वाऱ्यातुन घुमती
यज्ञयाग धगधगती, लाजे – इथे यावया यम

हिंस्त्र व्याघ्र धेनूसह चरती
हरिणशावके सुखे विहरती
गरुड-सर्प-अंतरी उमलते – सख्यत्वाचे सुम

इथे ज्ञान-वैराग्य विराजे
शांतिक्षमेचे सुगृह साजे
इथे बहरला तपोधनांच्या द्वारी कल्पद्रुम


ONKAR




५

अत्रिऋषींच्या पवित्र आश्रमात अत्रि-अनसूयेच्या तपोबलाने असा दत्तावतार झाला. दत्त म्हणजे ज्ञान आणि वैराग्य. दत्त म्हणजे तप आणि शांती. ब्रह्मा-विष्णु-महेश यांचे बालरूप पृथ्वीवर प्रकटले. पृथ्वी कृतार्थ झाली.

# अनसूयेच्या धामी

अनसूयेच्या धामी
आले त्रैलोक्याचे स्वामी !

गुलाल उधळा, उधळा सुमने
जयजयकारे घुमवा भुवने
पूर्ण ब्रह्म हे आले भूवर धर्मरक्षणाकामी

फुलाफुलांनो, सुगंध उधळा
विमल जलांनो, सहर्ष उसळा
पवनलहरिंनो, मंगल वार्ता कळवा ग्रामोग्रामी

आज जगी वैराग्य प्रकटले
दिव्य तपाचे पुष्प उमलले
योगगंध दर्वळती सुमधुर – त्रिभुवन - अंतर्यामी

हाच सद्‌गुरू त्रैलोक्याचा
उद्धारक हा चराचरांचा
हा योग्यांचा श्रीयोगीश्वर प्रभु हा त्रिभुवनगामी



६

दत्त हा योगीश्वर. त्याला नको बारसे—नका पाळणा. पण वात्सल्याने भरलेले स्त्रीहृदय स्वस्थ बसणार थोडेच! ऋषिपत्न्या जमल्या. त्यांनी लतापल्लवांचा पाळणा केला. अनसूयेने बाळराजाला त्यात निजविले. त्या तपोवनात वेदध्वनींना साथ देत आणि अनाहताची लय साकारीत, मधुर बालगीताचे वत्सल साद घुमले!


# जो जो बाळा अत्रिनंदना

जो जो बाळा अत्रिनंदना
बालयोगि मुनिहृदयरंजना !

पूर्ण शांति क्रांतीतुन मिसळे
तेज तपाचे नयनी उजळे
वदनि तुझ्या ॐकारघोषणा

गंगेचे मांगल्य मुखावर
मृदुल उषेचे हास्य शुभंकर
वेदांचे स्वर तुझिया रुदना

तू विधिहरिहर ब्रह्म सनातन
अनसूयेचा होसी नंदन
झुले आश्रमी योगपाळणा




# ७

हा तपोनिधी बालक्रीडा करीत घरात थांबला नाही. अत्रि-अनसूयाही सामान्य मातापिता नव्हते. त्यांनी त्याला अडविले नाही. मायपित्यांना वंदन करून, प्रतिचरणी भू पुण्यवती करीत, वैराग्याचे सुगंध उधळीत हा बालयोगी त्रिभुवनसंचाराला बाहेर पडला. पाखरांनी मधुर गीतांतून ही मंगलवार्ता जगाला सांगितली. वायुलहरींनी हे वृत्त घराघरांतून, वनावनांतून सर्वत्र पसरून दिले.

# श्री योगिराज चालले

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

श्रीयोगिराज चालले
दिव्य तनूवर उग्र तपांचे स्निग्ध तेज फाकले !

वेष दिगंबर, कांति मनोहर
भस्म चर्चिले सर्वांगावर
वैराग्याचे सुगंध सुंदर भवती दर्वळले

सुखोपभोगी पूर्ण विरक्ती
वृत्ति सदा आनंदमयी ती
शुद्ध स्फटिकसम विमल हृदय ते भरले शांतिजले

प्रतिचरणी भू हो पुण्यवती
प्रतिश्वसनी सौरभयुत धरती
आणि चराचर दर्शनमात्रे प्रेमरसे नाहले

करावया उद्धार जगाचा
तनय निघाला अत्रिमुनींचा
नभी दाटला थवा सुरांचा वर्षायास फुले


ONKAR




# ८

दत्तांचे तपःस्थान सह्याद्री. महाराष्ट्राचा हा महान मानदंड दत्तनिवासाने संपन्न झाला आहे.

दत्ताचे एके ठिकाणी स्नान, तर एके ठिकाणी संध्यावंदन. कुठे भिक्षा, तर कुठे भोजन. त्रिभुवनसंचारी तो; पण तपःस्थान मात्र सह्याद्रीच !

# धन्य धन्य तो सह्यगिरी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ८३६२८ वि: काव्य:
क्रमांक १९६५ नों: दि: 3/3/71

धन्य धन्य तो सह्यगिरी
जिथे निरंतर योगिराज श्रीदत्तदिगंबर वास करी !

विमल जलनिधी, विमल पवन ते
विमल गंध तरुलताफुलाते
विहगवृंद मंजूळ विमलतर अध्यात्माचे गान करी

करितो गंगास्नान तपोधन
पंढरिसी करि सुगंधलेपन
प्रीतिसंगमी संध्यावंदन, प्रसन्न आसन सह्यशिरी

भिक्षा गुरुची नित्य करविरी
भोजन होई पांचालेश्वरी
अर्घ्यदान ते पश्चिम सागरि, सह्यमंचकी शयन करी

सर्व काळ सर्वत्र विचरुनी
ज्ञानयोग वितरितो त्रिभुवनी
तपन करी एकांत साधुनी सह्याद्रीच्या गिरिकुहरी


Onkar



# १

कार्तवीर्य सहस्रार्जुन हा एक महान प्रतापी सम्राट होता. दत्तगुरूंच्या प्रसादानेच त्याला राज्यलाभ झालेला. अनेक वर्षे राज्योपभोग घेतल्यानंतर त्याचे मन राज्यभोगांना विटले. त्याला दत्तगुरूंचे स्मरण झाले. सर्व सुखांचा त्याग करून अनुग्रहासाठी त्याने सह्याद्रीकडे धाव घेतली. दत्तांचे पाय धरावे आणि त्यांच्या अमृतदृष्टीने पावन व्हावे, म्हणून त्याने प्रयत्नांची पराकाष्ठा केली. दत्तांनी त्याला चुकविण्याचेच ठरविले होते. ती त्याची कसोटी होती. तो दुःखी झाला. भारावलेल्या अंतःकरणाने तो त्या दयासागराला आळवू लागला.

# सह्याद्रीवर कार्तवीर्य तो

सह्याद्रीवर कार्तवीर्य तो
प्रार्थी अत्रिसुता
दर्शन द्यावे भगवंता !

मी अपार सुखभोग भोगिले
कर्दमासि त्या अंतर विटले
आज जाणिले, तुझी पाउले नाशितील भवव्यथा

निजभक्तांचे माहेरच तू
का न पुरविसी माझा हेतू
भक्तोद्धारक तव जयकेतू त्रिभुवनात फडकता

शरण तुला येता निजभावे
चरण दयाळा का चुकवावे
मरणभयाते त्वा हरवावे-सुखवावे दुःखिता



# १

कार्तवीर्य सहस्रार्जुन हा एक महान प्रतापी सम्राट होता. दत्तगुरूंच्या प्रसादानेच त्याला राज्यलाभ झालेला. अनेक वर्षे राज्योपभोग घेतल्यानंतर त्याचे मन राज्यभोगांना विटले. त्याला दत्तगुरूंचे स्मरण झाले. सर्व सुखांचा त्याग करून अनुग्रहासाठी त्याने सह्याद्रीकडे धाव घेतली. दत्तांचे पाय धरावे आणि त्यांच्या अमृतदृष्टीने पावन व्हावे, म्हणून त्याने प्रयत्नांची पराकाष्ठा केली. दत्तांनी त्याला चुकविण्याचेच ठरविले होते. ती त्याची कसोटी होती. तो दुःखी झाला. भारावलेल्या अंतःकरणाने तो त्या दयासागराला आळवू लागला.

# सह्याद्रीवर कार्तवीर्य तो

सह्याद्रीवर कार्तवीर्य तो
प्रार्थी अत्रिसुता
दर्शन द्यावे भगवंता !

मी अपार सुखभोग भोगिले
कर्दमासि त्या अंतर विटले
आज जाणिले, तुझी पाउले नाशितील भवव्यथा

निजभक्तांचे माहेरच तू
का न पुरविसी माझा हेतू
भक्तोद्धारक तव जयकेतू त्रिभुवनात फडकता

शरण तुला येता निजभावे
चरण दयाळा का चुकवावे
मरणभयाते त्वा हरवावे–सुखवावे दुःखिता

सद्‌गुरुराया तू करुणावन
पदी पातलो चातक होउन
द्या दीनासी चिरसुख जीवन-पाजुनिया अमृता

पहा एकदा करुणादृष्टी
करा कृपेची अमृतवृष्टी
करू नका हो मला हिंपुटी-माझ्या गुरुदैवता

भाव पाहुनी दत्त हासती
सरी कृपेच्या शिरी वर्षती
अष्टभाव भक्ताचे फुलती-हो जीवितसांगता


ONKAR



# १०

गंगेच्या जलौघाप्रमाणे असंख्य साधकांना सन्मार्ग दाखवीत परम पावन श्रीदत्तजीवन अथांग वाहत होते.

अनेक साधकांपैकी कार्तवीर्य सहस्रार्जुन महान साधक— दत्तगुरूंच्या दारुण परीक्षेतून उत्तीर्ण झालेला. दत्तगुरूंनी त्याला योगसाधना सांगितली आणि त्याचे वैभवशाली नृपजीवन कृतार्थ केले.

# अर्जुना साध योगसाधना

अर्जुना साध योगसाधना
उद्धरी ही मानवजीवना !

यम, नियमासन, प्राणायाम
प्रत्याहार, धारणा, ध्यान
आणि समाधी हाच असे अष्टांगयोग अर्जुना

सत्य, अहिंसा, अस्तेयादिक
यम संपादुन व्हावे साधक
उपवासादिक नियम पाळुनी–साधावे आसना

दशेंद्रियांचे दमन करावे
स्वमन, चित्त एकाग्र असावे
पूरक, कुंभक, रेचक करुनी जिंकावे प्राणा

चाळविता ती शुभकुंडलिनी
मन रंगे सानंद उन्मनी
प्रत्याहारे प्रज्ञा स्थिरवुनि, वरिणे दृढ धारणा

ध्याता आणिक ध्यान विसरणे
सगूण, निर्गुण ध्यानी रमणे
निर्विकार मग जडे समाधी, स्वयंब्रह्म भावना

परम सौख्य हे दुर्मिळ देवा
गुरुपुत्रा हा लाभे ठेवा
सकल मुक्ति तो सहजच पावे, पूजनीय त्रिभुवना

योगिराज हे स्वये सांगता
ज्ञान जाहले अर्जुनचित्ता
क्षण न लागता समाधिस्थ हो, पावे चिरसुखधना



स्वामि जनार्दन अतुल तपस्वी
वैभवीहि वैराग्य अनुभवी
कैवल्याची बाग बहरवी - चिदानंद भोगीत निशिदिनी

एकनाथ तर महान योगी
दत्तकृपे स्वात्मसुखा भोगी
महाग्रंथ वाचिता तयांचे-अगणित पापे जाती जळुनी

माणिक प्रभु, अक्कलकोटेश्वर
टेंबे स्वामी तसे योगिवर
कारुण्याचे केवळ सागर – सुपथ दाविती निज आचरणी

असे भक्तवर दत्तगुरूंचे
सह्य विंध्य ते घोर तपांचे
भय न जयांना कलिकाळाचे–स्मरणे ज्याच्या पावन धरणी


ONKAR

म्हणती – 'माते, झाली तृप्ती
सांगे इच्छा काय असे ती'
'सत्य करा वच,' बोले सुमती
'पुत्र तू होई रे अमुचा'

दत्तगुरू मग 'तथास्तु' वदले
सुमतीउदरी जन्मा आले
नंदनवनसम गृह ते फुलले
दर्वळे सुगंध सौख्याचा

होय सुवेळी मौंजीबंधन
विद्यामंडित शोभे नंदन
मायपित्यांचे मोहरले मन
'उद्या' पण कुणा कळायाचा !

योग्य वयी त्या सुचवी माता
‘ सुता, वरावी सुशील कांता ’
माउलिचे ते शब्द ऐकता
अलौकिक बोले सुतवाचा

‘ विरक्तिशी मम विवाह ठरला
दुजी सती नच भुलवी मजला
द्या आज्ञा जाण्यास तपाला
वेध मज विश्वोद्धाराचा ’

मातृपितृमन बोधे सुखवुनी
निघती मग श्रीपाद तेथुनी
कुरवपुरी बहुकाळ राहुनी
मनोरथ पुरविति भक्तांचा




## १३

श्रीपाद श्रीवल्लभ कुरवपुरी असता त्यांनी अनेक जडजीवांचा उद्धार केला–अनेकांच्या कामनांची संतृप्ती केली. तिथल्या एका परटाला वर देऊन त्यांनी त्याला बेदरचा बादशहा बनविले. ती मनोहर कथा अशी ––

# सिध्द सांगती शिष्याला

सिद्ध सांगती शिष्याला
रजक कसा नृपवर झाला

कुरवपुरी श्रीपाद राहती
संध्यावंदन, तप आचरिती
परिट एक सद्भावे नमितो श्रीपादांच्या चरणाला

सहज एकदा कोणी नृपवर
पुत्र-कलत्रासह गंगेवर
करितो नौकाविहार सुंदर, रजक भुले ऐश्वर्याला

मनी म्हणे मी किती अभागी
नित्य दैन्यदारिद्र्यच भोगी
हे नयनांनी दुरुनी पहावे, धिग् धिग् असल्या जगण्याला


येता श्रीगुरु नदीकिनारी
भक्तेच्छा जाणिली अंतरी
पुशिति– ' राज्यपद आज हवे का, हवे तुझ्या परजन्माला '

रजक बोलतो लाजत लाजत
' वृद्ध कसा मी भोगू दौलत
राज्यश्रीसहवास सुखप्रद बालपणापासून मला '

गुरू ' तथास्तु ' अवचित वदती
होय रजकजीवीतसमाप्ती
विदुरानगरी जन्मुनिया तो भूषवि मग नृपवंशाला

कल्पवृक्ष श्रीपाद मनोहर
शांतविती निजसेवक-अंतर
उत्पत्तिस्थितिलयकर्ता जो, काय उणे तद्भक्ताला


ONKAR



# १४

श्रीपादांनी साधकांना सन्मार्ग दाखविला. जनांची धर्मवासना वाढविली. उदरव्यथेच्या मनुष्याला रोगमुक्त केले. एका भक्ताला चोरापासून सोडविले. अवतारी पुरुष जन्माला येण्यासाठी अंबिकेला शनिप्रदोषव्रत सांगितले आणि एवढे सगळे अवतार-कार्य समाप्त झाल्यानंतर करुणासिंधू श्रीपाद कुरवपुरातील जनसंमर्दाला अखेरचे दर्शन देऊन निजानंदी निमग्न झाले.

आश्विन वद्य द्वादशी । नक्षत्र मघा मृगराशी ।
श्रीपाद बैसले निजानंदेसी । अदृश्य झाले गंगेत ॥

याप्रमाणे श्रीपादांनी अवतार संपविला. कुरवपुरात एकच आकांत माजला; पण काळसरिता अखंड वाहत होती. तीवर प्रसन्न जीवन-कमळे फुलत होती. पुढे दत्तगुरूंचा दुसरा अवतार झाला. कुठे? तर वऱ्हाडात कारंजे नगरी, अंबा-माधवाच्या घरी.

# जन्मुनी अंबामाधव घरी

जन्मुनी अंबामाधवघरी
दत्त तो संन्यासाश्रम वरी !

शिवपूजक ती असे दंपती
शनिप्रदोषव्रत आचरती
त्यांच्या सदनी अयोनिसंभव अवतरले श्रीहरी

नाव नरहरी सार्थ ठेविलें
ज्योतिर्विद शुभ भविष्य वदले
मायतात हर्षोत्सव करिती, स्वर्ग फुले भूवनी

मूका परि हा बाळ न बोलें
परी अलौकिक करितो चाळे
लोह स्पर्शिता सुवर्ण होई, चकित करंजापुरी

उपनयनी त्या फुटुनी वाणी
चार वेद उद्घोषी वदनी
पाहुनि अद्भुत बालककरणी स्तिमित सुजन अंतरी

वडिलांच्या आज्ञेने नरहरि
त्वरित पातले काशीनगरी
संन्यासाश्रम वरिति सत्वरी पवित्र गंगातिरी

नाम मिळे नरसिंह सरस्वती
अगाध ज्ञानी झाली ख्याती
तीर्थाटन आचरीत गुरुवर भ्रमती धरणीवरी


औदुंबर, वाडी, गाणगापुर
वास करी यतिराज निरंतर
उपदेशामृत पाजो सुमधुर साधु, सुजन उद्धरी

श्रीगुरु शीतल सुगंधवारा
करी सुगंधित परिसर सारा
रुजविति अंकुर करुणाधारा, सुकल्या धरणीवरी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ८३८२४ वि: काव्य
क्रमांक १९४५ नों. दि. 3|3|71

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ७८८०५






# १५

श्रीनरसिंह सरस्वतींनी बहुत तीर्थाटन केले. उत्तर-दक्षिण-यात्रा पुऱ्या केल्या. सत्‌शिष्यांना बोधामृत पाजले. दुःखितांना दुःखमुक्त केले. संन्यासधर्मांची विजयपताका नभोमंडलात फडकविली. श्रीगुरुंनी आपल्या दीर्घ सहवासाने पावन केली ती तीन स्थाने-औदुंबर, वाडी आणि गाणगापूर. श्रीगुरू प्रथम आले क्षेत्र औदुंबरी, कृष्णेच्या पावन तीरी. कृष्णा ही सुखवार्ता दशदिशांना सांगत सुटली.

# कृष्णा सांगे निजपुत्रांना

कृष्णा सांगे निजपुत्रांना पुण्यमयी गोष्ट ती
माझ्या तीरावरी राहती एक तपस्वी यती !

भस्मोद्धूलित सतेज कांती
सूर्य चंद्र नयनांत उजळती
हृदयी करुणा, वदनी शांती, स्वात्मसुखा भोगिती

नित्य स्वर्गिचे सुरही येउन
गुरुचरणाचे घेती दर्शन
नारद तुंबर सुस्वर गाउन योगींद्रा सुखविती

मी श्रीगुरुचे चरण क्षाळिते
पक्षी गाती मंजुळ गीते
तरुही करिती शीतल छाया, वायू श्रम वारिती

स्नान गुरूंचे तिन्ही त्रिकाळी
योगसाधना शांत सुवेळी
आत्मानंदी मग्न निरंतर, समदृष्टी पाहती

नित्य गुरूंचे घडता दर्शन
पावन होई माझे जीवन
पतित जिवांना उद्धाराया ये शक्ती मजप्रती


Onkar



# १६

येथील श्रीगुरूंचा गुप्त वास प्रकट केला तो भिलवडीच्या भुवनेश्वरीनं. कोल्हापूरच्या मूढ ब्राह्मणपुत्राला औदुंबरी विद्यालाभ झाला, ती कथा मोठी मनोहर अन् अज्ञानहारक आहे.

# कृष्णाकाठी श्री औदुंबरि घडली एक कथा

कृष्णाकाठी श्री औदुंबरि घडली एक कथा
विद्या लाभे करवीरीच्या विमूढ विप्रसुता !

करवीरीचा सुबुद्ध ब्राह्मण
तया मानिती बहु विद्वज्जन
पुत्र तयाचा मूढ निपजला, जाळी अपमानिता

सुता निखंदिति सकळ नगरजन
' जनक यशा लाविलेस लांछन '
देहत्यागा सजे, व्हावया दुःखातुनि मुक्तता

सुचवि सुहृज्जन भिलवडीस जा
जिथे माय भुवनेश्वरि गिरिजा
जागृत दैवत पाजिल तुजला सुमधुर विद्यामृता

विप्रकुमर अन्नोदक वर्जुन
अनुष्ठान–जप करि रात्रंदिन
परि न देवता द्रवली बघुनी ऐशा कठिण व्रता

छेदुनि जिव्हा वाहे चरणी
करी प्रतिज्ञा कुमार कोपुनि
'वाहुनिया शिर कमल तुझ्या पदि करीन व्रतसांगता'





# १७

त्या मूढ विप्राची अशी ही घोर प्रतिज्ञा ऐकून देवी द्रवली. मध्यरात्रीला मंदिरात सहस्त्र सूर्यांचे तेज तळपले. विप्रकुमार भयाने गर्भगळीत झाला. देवीच्या मुखातून शांत-गंभीर शब्द उमटले –

" ऐक बाळ ब्रह्मचारी । का आक्रोशसी आम्हावरी ।
असे कृष्णापश्चिमतीरी । त्वरित जाय तये स्थानी ॥
औदुंबराचे वृक्षातळी । असे तापसी महाबळी ।
अवतारपुरुष चंद्रमौळी । तुझी वांच्छा पुरवील ॥ "

तो साक्षात्कार होता; दृष्टांत होता !

# भुवनेश्वरिच्या मुखकमलातुन ये अमृत उद्गार !

भुवनेश्वरिच्या मुखकमलातुन ये अमृत उद्गार
द्विजसुता झाला साक्षात्कार !
तुझ्या तपाने प्रसन्न झाले
मातृहृदय प्रेमाने भरले
तुझ्या हिताची गोष्ट सांगते—साधाया उद्धार
श्री कृष्णेच्या पैलतिरावर
असे दत्त अवधूत दिगंबर
यतिवेषे तुज दिसेल बसला—जो त्रैलोक्याधार
भस्मविलेपित उज्ज्वल कांती
दंड कमंडलु शोभे हाती
भगवी वसने अंगावरती—हृदयी शांति अपार
जा तेथे धरि चरण तयाचे
पुरविल मग तो कोड मनीचे
तीच माउली त्रैलोक्याची—करील चिंता पार

शब्द देविचे ऐकुनि उज्ज्वल
आला तरुनी कृष्णेचे जल
दर्शन घडता गुरुचरणांचे—आनंदा नच पार

कृपाकटाक्षे श्रीगुरु बघता
जिव्हा आली येइ बोलता
विषाद कथिता गुरुवर हसला—वर्षे अमृतधार

गुरुकृपे हो विद्यामंडित
सुजनमान्य तो झाला पंडित
ज्ञानरवी प्रकटला विराला—अज्ञानांधःकार


ONKAR




# १८

श्रीगुरु पुढे नृसिंहवाडीस निघाले. त्यामुळे औदुंबराचे परिसरातील लोकांना अतीव दुःख झाले. त्यांनी गुरुमाउलीचे चरण अश्रूंनी भिजविले. एकच करुणोद्गार – " महाराज, जाऊ नका – मग आम्हांला कोण आधार ? "

श्रीगुरू म्हणाले, " माझ्या पादुका इथं राहतील. त्यांचं पूजन तेच माझं पूजन. माझं स्मरण करा. इथे औदुंबर वृक्षातळी मी नीरंतर आहे. "

मग श्रीगुरू कृष्णापंचगंगेच्या पवित्र संगमस्थानी कुरुंदवाड ग्रामसन्निध गेले. दुःखितांना दुःखमुक्त करीत – तृषितांना शांतवीत – श्रीगुरूंची शीतल जीवनधारा वाहत होती. तिथं असंच एक नवल घडलं. एका दरिद्री ब्राह्मणाघरचा घेवड्याचा वेल तोडून श्रीगुरूंनी त्याचं दारिद्र्यच नाहीसं केलं.

# कुरुंदवाडी असता श्रीगुरु नवल एक वर्तले

कुरुंदवाडी असता श्रीगुरु नवल एक वर्तले
वेल नच दारिद्र्यच खंडिले !

अमरापुरिचा सुव्रत ब्राह्मण
मित्र तयाचा दैन्यच अनुदिन
पुत्र कलत्रा भिक्षेवरती कसेतरी पोशिले

घेवडियाचा वेल अंगणी
आधारच तो एक जीवनी
त्याच्या शेंगा भक्षुनि त्यांनी दिवसमास काढिले

माध्यान्ही गुरु येता सदनी
भिक्षा वाढी विप्रकामिनी
वेल परी अंगणिचा तोडुनि गुरु मठात परतले

वेल नव्हे - हे जीवन तुटले
विप्रमस्तकी नभ कोसळले
ऊर बडवुनी म्हणे यतीने का आम्हा शापिले


विप्र विचारी, दुःख आवरुन
हळू शांतवी कांतेचे मन –
'प्रारब्धाचे जगात क्रीडन कोणी का चुकविले'

मूळ काढण्या खणिता अंगण
मुळाखालती सापडले धन
स्वर्णपात्र बघता ब्राह्मण मन चकित–भ्रमित जाहले

विप्र सतीला जवळ बोलवी
कनकपात्र ते तिला दाखवी
म्हणे – ' यतीने वेल नव्हे – हे दारिद्रयच खंडिले '

पतिपत्नी गुरुसंन्निध येती
धनवार्ता ती हर्षुनि कथिती
म्हणति – ' यती तवरूपे जगती जगदीश्वर प्रकटले '

हसुनि म्हणति गुरु – ' रहा सुखाने
संतोषित मी शुद्धाचरणे
लक्ष्मिवंत नांदाल निरंतर स्वधर्म निष्ठाबले '



# ११

श्रीगुरूंच्या सहवासाने कृष्णा–पंचगंगा–संगमस्थान पावन झाले. असंख्य जन दुःखमुक्त झाले. अनेक चमत्कार तिथे घडले. कृष्णा प्रवाहातील चौसष्ट योगिनींची सेवा श्रीगुरूंनी घेतली. एका गंगानुजाचा उद्धार केला. असे तिथे आपल्या करुणेचे सिंचन करून यशाचा सुगंध दरवळत ठेवून श्रीगुरु भीमा–अमरजासंगमी गाणगापुरी आले. तिथेही करुणेचे सिंचन होऊ लागले. यशसौरभ दरवळू लागला. एका दरिद्री ब्राह्मणाघरची वांझ महिषी दुभती झाली.

# कधि न पाहिले ते घडले

कधि न पाहिले, ते घडले
कधि न ऐकिले, ते घडले
वांझ महिषिने दूध दिले !

गाणगापुरी असता गुरुवर
एक एक घडतसे नवलतर
शरद्चंद्रिका फुलता सुंदर, सुजन रसिकवर मोहरले

महादरिद्री होता ब्राह्मण
चरितार्थाचे महिषी साधन
वांझ जरी ती, वाही माती, तिनेच जीवन चालविले


श्रीगुरु तद्‌गृहि भिक्षे जाती
धन गर्वे जन त्यांना हसती
मिळेल भिक्षा कैसी म्हणती, संन्यासी हे अति ठकले

एक दिनी नच काम महिषिला
द्विज भिक्षेस्तव ग्रामी गेला
मेघ दयेचा सदनी वळला, द्विजसति वंदी पदकमले

प्रार्थी ती ' पति येतिल आता
वाढिन भिक्षा मग गुरुनाथा '
स्वामी वदती – ' महिषि असुनि घरि का मजला गे थांबविले '

' दुग्ध दोहि ' गुरु आज्ञा देती
दोहन करि विश्वासुनि युवती
नवल, शुभ्र पयधारा झरती, द्विजगृहि फुलती भाग्यफुले

प्राशुनि पय ते गुरू तुष्टले
द्विजसदनीचे दैन्य पळाले
रविउदयी घनतिमिर लोपले, गुरुपदकमली मन जडले



# २०

ती वार्ता वाऱ्यांनी दशदिशांत पोचविली. गाणगापूरच्या राजाच्याही ती कानी गेली. त्याने संगमावरून श्रीगुरुंना मोठ्या समारंभाने गाणगापुरात आणले. तिथे श्रीगुरूंनी एका ब्रह्मसंमंधाला सद्गती दिली. पुढे जवळच्याच कुमशीग्रामीच्या त्रिविक्रम भारती या नृसिंहभक्त–ब्राह्मणाला विश्वरूप दाखवून त्याचा उद्धार केला. ते एक अभिनवच घडले.

# अभिनव घडले

अभिनव घडले
अभिनव घडले
विश्वरूप कलियुगी प्रकटले !

कुमशी ग्रामी त्रिविक्रम यती
नरसिंहावर करितो प्रीती
करि निंदा पण नित्य गुरूंची, म्हणतो भूवरि दंभ मातले

गुरु द्विजाचे जाणिति अंतर
भेटायाते निघती सत्वर
नृप ग्रामीचा शिष्य गुरूंचा, त्याने गुरुप्रस्थान सजविले

बसवुनिया शिबिकेत यतींना
सवे अश्व, गज, दे निजसेना
शिष्यादिक संगती, श्रीगुरू, तारांगणि जणु चंद्र शोभले

नित्यासम मानसपूजेला
विप्र विविक्रम निवांत बसला
नृसिंह मूर्ती येइ न ध्यानी, म्हणे कसे तप निष्फळ ठरले

मानसपूजेच्या रूपाने
पाहियली गुरुमूर्ती त्याने
नमित, दंडवत करित निघाला, परी तयाला अघटित दिसले

सर्व दंडधर यतीच दिसती
ओळखे न त्या श्रीगुरुमूर्ती
फिरतो भ्रांतपणे, कुंठितमति, करुणावचने मग तो बोले

‘ प्रभू आवरा अपुली माया
लीलाधारी श्रीगुरुराया
मी चुकलो, मी भ्रमलो वाया, अखिल चराचर मजला हसले ’

श्रवुनी त्याची आर्त विनवणी
आवरिती निजरूप मोहिनी
सुखमय अपुले स्वरुप दावुनी, शुद्ध तयाचे मानस केले

श्रीगुरु हसुनी वदती त्याते
‘ पावलास तू मोक्षपदाते
जिंकलेस तू भवचक्राते, मम भक्ताला मी उद्धरिले ’



२१

श्रीगुरूंची करुणादृष्टी जिथे जिथे गेली, तिथे तिथे सुकल्या काष्ठांना नवे अंकुर फुटले. शुष्क सरिता जलवंती बनल्या. माळावर नंदनवन फुलले. माहुरग्रामीच्या महासाध्वी सतीच्या मृत पतीला श्रीगुरूंनी संजीवन दिले. झोपेतून माणूस उठावा, तसा तो उठून बसला. अद्‌भुत चमत्कार झाला.

# निद्रेमधुनी जशी जागृती

निद्रेमधुनी जशी जागृती, उठला विप्रकुमार
चितेमधुनिया फुले सतीचा पुन्हा नवा संसार !

माहुर ग्रामी होता द्विजवर ' दत्त ' तयासि कुमार
विवाह त्याचा करी, गृही ये स्नुषा शांत सुकुमार
लिही ललाटी काय विरिंची कुणा कसे कळणार ?

नुकती तिचिया संसाराची उमलत होती कळी
क्षयसर्पाने पतिस दंशिता कोसळली भूतळी
नूतन अरुणोदयास ग्रासी अवसेचा अंधार

कांत शुश्रुषा करी, झिजावे जसे मृदुल चंदन
सेवायज्ञी जाळित होती देहाचे कांचन
कंठित होती जीवन, ठेवुन निजदैवावर भार

वैद्य, ज्योतिषी, मांत्रिक झाले; अल्प न येई गुण
सूज्ञ सांगती यश ना लाभे श्रीगुरुचरणाविण
गाणगापुरी आणी पतिते, करीत शोक अपार

मावळला पण आशादीपक फूल लतेचे गळे
सान कलीवर फुलता फुलता विशाल नभ कोसळे
करुणा होय कठोर, फुलावर झाला वज्रप्रहार

आसु ढाळिते हृदय तियेचे, नेत्र परी कोरडे
दुःख अनावर बघुन पडावे वज्रालाही तडे
भीमामरजेमधुनी वाहे दुःखाश्रूंची धार

सती जावया सिद्ध सती हो अपुल्या पतिसंगती
ग्रामलोक वारिती परी ती अभंग सतिची मती
कौतुक बघण्या जमती गगनी देवांचे संभार

अग्निप्रवेशापूर्वी घ्यावे श्रीगुरुचे दर्शन
म्हणुनि सती ये अश्वत्थतळी करण्या पदवंदन
'सौभाग्यवती भव' गुरु वदता चकित सर्व प्राकार

गुरुरायांची प्रेमळदृष्टी फिरता प्रेतावरी
प्राण संचरे कणाकणांतुन विरली घनशर्वरी
प्रभात उमले गुरुकृपेचा घडता साक्षात्कार



# २२

हा विप्रकुमार जेव्हा मृत झाला होता, तेव्हा शोक करणाऱ्या त्याच्या पत्नीला ब्रह्मचारी वेषाने श्रीगुरूंनी बोध केला होता.

कालगतीच्या महाचक्राचे प्रताप पतिनिधनाने विकल झालेल्या त्या स्त्रीला सांगून गुरूंनी तिला सावरले. श्रीगुरू म्हणाले—

# कालगतीचे महाचक्र ते अविरत भिरभिरते !

कालगतीचे महाचक्र ते अविरत भिरभिरते
तयातुन कोणी नच सुटते !

कल्पकोटी आयुष्य सुरांचे
घास अखेरी ते मृत्यूचे
समर्थासही क्षमा न करिते चक्राचे पाते

कोण जनक माउली कुणाची
पती कुणाचा सती कुणाची
सरता जीवन प्रेमळ नाते ठरते मृगजळ ते


कर्मगुणे येई गर्भी नर
नाश तयाचा तयाबरोबर
पूर्व सुकृतापरी लाभते सौख्यदुःख फळ ते

पक्षी जमती वृक्षावरती
चार प्रहर रंगती संगती
अपुलाले पथ क्रमिती, तुटते क्षणभंगुर नाते

जलप्रवाही केव्हा अवचित
येउनि मिळती काष्ठे अगणित
दुज्या क्षणी दाहि दिशा जाती अन्य प्रवाम्माते

देह पंचभूतात्मक जाणे
चर्ममास मज्जास्थि साधने
मळबद्धा क्षणभंगुर तनु! कां कवळावे तीते

नाशिवंत तनु शोक कशाला
मृत्युयोग का कुणास चुकला
गुरुचिंतनि आयुष्य क्रमावे शांतमुदित चित्ते


ONKAR




# २३

याच सतीला श्रीगुरूंनी पतिव्रताधर्म सांगितला, की ‘पतीविना सतीला गती नाही. पतिसेवा म्हणजेच ईश्वरसेवा !’

# सतीला तोच एक ईश्वर

देव विप्र साक्षीने वरिला हृदयाने जो वर
सतीला तोच एक ईश्वर !

पतिवाचुन सतिजीवन वाया
नित्य झिजावे त्या सुखवाया
पुष्प बनुनि ठेवणे सुगंधित कांताचे अंतर


पतिच्या कार्यी मंत्री व्हावे
पती भोजनी माय बनावे
रंभेपरि शयनी सुखवावे छेडुनि प्रीतिस्वर

कांत संगती तनु सजवावी
ग्रामी जाता सुखे त्यजावी
सुखदुःखाशी समरस व्हावे जाणुनि पति अंतर

करणे सासूश्वशूर सेवा
दीर नणंदा प्रमोद द्यावा
सदनी अतिथी तृप्त करावा राहुनिया तत्पर

उठुनि आधी प्रभातकाळी
सारुनि संमार्जन रांगोळी
समाधान वृत्तीने अपुले सजवावे मंदिर

शीलवती स्त्री पतिला भूषण
भाग्य तयाचे झाडी अंगण
पतिव्रतेच्या पवित्र चरणी नमविति माथा सुर


ONKAR



# २४

श्रीगुरूंच्या सांन्निध्याने गाणगापूरचा परिसर फुलत होता, मोहरत होता. भक्तिसिंधूला उधाण आले होते. अन्नसंतर्पण, समाराधना चालू होती.

श्रीगुरूंकडे कोणी काही मागण्यासाठी येत, कोणी काही अर्पण करण्यासाठी येत.

एकदा भास्कर नावाचा गरीब ब्राह्मण आला. सद्‌गुरूंना भिक्षा वाढण्यासाठी तीन शेरांचा शिधा त्याने आणला होता; पण त्याची इच्छा लवकर पुरी होईना. रोज असंख्य भक्त येत. नानातऱ्हेची पक्वान्ने करून भिक्षा वाढीत. समाराधना करीत. ब्राह्मणाच्या बिचाऱ्याच्या पुरचुंडीला कोण पुसणार? त्याची थट्टा होऊ लागली. पण सर्वसाक्षी श्रीगुरु! त्यांनी त्या विप्राला बोलाविले आणि आश्वासिले. 'उद्या तू भिक्षा कर. उद्या तुझे संतर्पण.' ब्राह्मण मोहरला. तोच आपली कथा सांगतो आहे—

# तीन शेर मी धान्य आणिले

तीन शेर मी धान्य आणिले
सहस्त्रावधी कसे जेविले
श्रीगुरुंनी हे अघटित केले !

श्रीगुरु असता गाणगनगरी
इच्छा उपजे मदिय अंतरी
वाढुनि भिक्षा यतिवर्यांना सफल करावे जीवित अपुले

गाठोडे बांधून पाठिशी
आलो सत्वर गुरुचरणाशी
दर्शन घडता लाभे काशी, आनंदाचे कुंज बहरले

रोजच चाले समाराधना
भिक्षा होई नित्य गुरुंना
अपुली सेवा कशी घडावी, हे मज दीना कोडे पडले

रोज जेवुनी समाराधनी
अतृप्तच मी अंतःकरणी
गुरुंनी माझे दुःख जाणुनी क्षेमकुशल की माझे पुशिले

" उद्या ब्राह्मणा तुझीच भिक्षा
सुफलित होवो तव आकांक्षा
सांग मठी, गावात, निमंत्रण " श्री. गुरुंचे वच अमृत गमले

गुरु आज्ञेने दिले निमंत्रण
चिंता ग्रासी परि माझे मन
शिधा अल्प मम कसा पुरावा, हसेच होइल पुरते अपुले

कुणि म्हणती पुरचुंडी याची
कशी कुणाला पुरावयाची
कुणि म्हणती, गुरुवचने वदतो, सेवु घासभर मिळेल तसले

अन्न तोवरी तयार झाले
बोलावुनि गुरु मला बोलले
' छाटी झाकुनि अन्नावरती तीर्थप्रोक्षी कमंडलुतले '

मांडुनि होता पाने सगळी
ग्रामजनांची पंक्ती बसली
अन्न सरेना, सकळ तुष्टली, गुरुकृपेने कोडे सुटले

गाणगपुरिचा कोणीही जन
नसे उपाशी, अन्नावाचुन
बघता पण शिजल्या पात्रांतुन, अन्नहि नव्हते मुळि सरलेले

नदीतील प्राण्यांना घालुन
गुरुआज्ञेने केले भोजन
गुरुकरुणेचे होता सिंचन, तृप्तच माझे जीवित झाले

भांडारी तो कुबेर ज्याचा
तद्भक्ता दुष्काळ कशाचा
रविउदयी हो नाश तमाचा, सकल मनोरथ त्याचे पुरले




२५

सारे अद्‌भुत, सारे अलौकिक! श्रीगुरु म्हणजे कृपेचा जलधर! तो जिथे वर्षला, तिथे तिथे माळावर वनराई घनदाट झाली. शुष्कतरू पानी-फुली बहरले.

सोमनाथ विप्राच्या साठ वर्षे वयाच्या वंध्या पत्नीला गुरुकृपेने संतती झाली. असा हा मेघ! सावळा, संपन्न, दयावंत!

# होतसे वंध्या पुत्रवती

गुरुकृपेचा मेघ वर्षता शुष्कतरू फुलती
होतसे वंध्या पुत्रवती !

सोमनाथ विप्राची पत्नी
गंगा नामे सुशील गृहिणी
सेवा करि ती, ठेवुनि श्रद्धा गुरुचरणावरती

एक दिनी तिज श्रीगुरु पुसती
' काय वासना तुझिया चित्ती '
गुरुवचन तिला अमृत गमले, बोले साध्वी ती

' देव आणि अश्वत्थ पूजिते
सुत–प्राप्तीस्तव झिजते, झुरते
परजन्मी तरि होइन काहो प्रभु मी पुत्रवती '

गुरुवचनातुन शब्द निघाले
शब्द नव्हे; मधुबिंदू झरले
' याच जन्मि कन्या सुत होतिल, पतिव्रते युवती

संगमि करि अश्वत्थपूजना
पुरेल सत्वर तुझी कामना '
व्रतस्थ राहूनि सेवा करि ती, ध्याते गुरुमूर्ती


तृतिय दिनी ती स्वप्न पाहते
शुभवार्ता द्विज सांगे तीते
प्रदक्षिणा करि सात गुरूते, होशिल भाग्यवती

करी प्रभाती गुरुपदवंदन
प्रदक्षिणा करि, करि नीरांजन
श्रीगुरु तिजला प्रसाद म्हणूनी दोन फळे देती

फळे भक्षिता अघटित करणी !
वृद्धा झाली नवी गर्भिणी
नववे मासी कन्या जन्मे लोक नवल करिती

पुढे – पुत्र हो, घडले अभिनव
सोमनाथ द्विज करि हर्षोत्सव
साफल्याचे तरु मोहरले, सुगंध दर्वळती

श्रीगुरुलीला अद्‌भुत, अघटित
सिद्धि सकलही श्रीगुरुअंकित
वेदपुराणे गुरुरायांच्या गुणगानी थकती



# २६

नरहरी नामक एक ब्राह्मण कुष्ठव्यथेने मृत्युयातना भोगीत होता. तो गुरुसंन्निध आला. आपले दुःख त्याने श्रीगुरूंना कथन केले. दयाघन श्रीगुरु द्रवले. त्यांनी उपाय सांगितला, तो तरी किती आगळा! सर्पणातले सुकलेले काष्ठ त्याला देऊन ते म्हणाले–

**–जया दिवशी काष्ठासी। पर्णे येतील सजीवेसी।**
**पाप गेले तुझे दोषी। अंग तुझे होईल बरवे ॥**

आणि तो चमत्कार घडला. सुकल्या काष्ठाला पल्लव फुटले. नरहरी रोगमुक्त झाला.

# भीमामरजा संगमस्थानी नवल एक घडले!

भीमामरजा संगमस्थानी नवल एक घडले
सुकल्या काष्ठा गुरुकृपेचे नवपल्लव फुटले !

नरहरि नामे कुष्ठी ब्राह्मण
भार तयासी झाले जीवन
बहुत औषधी शमवि न व्याधी दुष्कृत नच संपले

दर्शन घडता सत्पुरुषांचे
शमन होतसे भवव्याधीचे
म्हणुन येउनी गाणगभुवनी वंदी गुरुपाउले

दुःख विदित करि गुरुपदकमली
मुक्त व्यथेतुनि करा माउली
करुणासागर उपाय सुखकर व्यथित द्विजा बोलले

‘ शुष्क काष्ठ ते संगमि रोवुन
घाल तया नेमाने जीवन
पल्लव फुटता व्यथा तुझी रे जाइल श्रद्धाबले’

भाव ठेवुनी गुरुचरणावर
काष्ठा घाली उदक विप्रवर
म्हणति तया जन, अशक्य सांगुन गुरुंनी तुज फसाविले

थट्टा त्यांची तो नच मानी
श्रद्धा त्याची श्रीगुरुवचनी
काष्ठा घाली द्विज तो पाणी, व्रत अविरत चालले

आणि एकदा घडले अभिनव
सुकल्या काष्ठा फुटले पल्लव
हसला ब्राह्मण, चकित नगरजन, म्हणति नवल पाहिले

कल्पद्रुम जणु श्रीगुरुमूर्ती
आश्रित वरिती चिरसुख शांती
जे जन भजती, भाविक चित्ती अमरपदी रंगले



## २७

आणि हा सायंदेव ! श्रीगुरूंच्या पट्टशिष्यांपैकी एक. नामधारकाचा पूर्वज. श्रीगुरूंची कीर्ती ऐकून तो गाणगापुरी आला. श्रीगुरूंच्या संन्निध राहून निरंतर सेवा करण्याची इच्छा त्याने प्रकट केली. श्रीगुरूंनी त्याची परीक्षा पाहिली आणि कसोटीला उतरल्यावर त्याला आपल्या शिष्यपरिवारात स्थान दिले.

मात्र गुरुसेवा कठीण याचा त्याला चांगलाच अनुभव आला.

# कठिण कठिण अति श्रीगुरुसेवा

ग्रं. क्र. १४८०५

कठिण कठिण अति श्रीगुरुसेवा
येइ अनुभवा सायंदेवा !

सिद्ध सांगती, तव पूर्वज हा
तोडुनि अवघ्या प्रपंच मोहा
गुरूपदि रतला, तुला लाभला, त्याच्या पुण्ये अमोल ठेवा,

सायंदेव गुरूंना विनवी
अपुली सेवा सतत घडावी
गुरु म्हणती, का शिणसी ! सेवाधर्म कठिण तुज कसा जमावा

इच्छा त्याची प्रबल पाहुनी
सेवा घेती गुरू निशिदिनी
परी एकदा गुरू पाहती, प्रखरतर तया निष्ठाभावा



ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
अनुक्रम ५३६२८ वि: काव्य

गुरु शिष्यासह संगमि बसले
तोच भयंकर वादळ उठले
विजा तळपती, धारा पडती, तिमिर दाटले, यमही भ्यावा

उभा राहुनी गुरुसंन्निध तो
तुफानात त्या गुरुंना जपतो
अवखळ वारा-पाउस सोसे, मुळि न दाविता आळस थकवा

श्रीगुरु म्हणती – ' शीत भयंकर
अग्नि आण गावातुन सत्वर
काळोखातुनि भक्त निघाला, श्रीगुरुसेवा तया विसावा

घेउनि अग्नी येता परतुन
भ्याला भवती भुजंग पाहुन
गुरुस्मरणे पथ क्रमित निघाला, करित गुरूंचा मनात धावा

येता धावत संगमस्थानी
वेदघोष तो ऐके श्रवणी
नव्हते परि कुणि गुरूवाचुनी, वेदघोष मग कुणी करावा

आणि एक त्या दिसले अद्भुत
वंदन करिती सर्प गुरूप्रत
तोच, वायु, पर्जन्य संपला, चंद्र खुलावितो गगनवैभवा

श्रीगुरु म्हणती 'सायंदेवा
जमेल का तुज असली सेवा'
भक्त म्हणे – 'गुरु तूच विसावा, तव सेवा मज मंगल ठेवा

श्रीगुरु देती मग आश्वासन
घेति निरंतर सन्निध ठेवुन
कृपामृताचे करिती सिंचन, का न भाग्यतरु मग बहरावा ?




## २८

श्रीगुरूंनी तंतुक नावाच्या एका विणकर भक्ताला क्षणार्धात श्रीशैल्य पर्वतावर नेऊन त्याला मल्लिकार्जुनाचे दर्शन घडविले.

अशक्य काहीच नव्हते ! अप्राप्य काहीच नव्हते. मनात आणावे ते घडावे. असे ते गुरुमाहात्म्य संपन्न होते, समर्थ होते.

# गुरूंचा विणकर भक्त महान

गुरूंचा विणकर भक्त महान
तयासी लाभे भाग्यनिधान !

नित्य करीतो गुरुपदवंदन
स्मरणी, ध्यानी रतले जीवन
गुरु तया सर्व सुखाची खाण

आप्त बंधुजन, सारे ज़मती
शिवरात्रिस श्री शैल्या जाती
म्हणे तो गुरु मज शंकर जाण

शिवरात्रिस गुरु पुसती त्याते
' देखिलेस का श्रीशैल्याते ? '
बोलला–' माझा तुज अभिमान '

श्रीगुरु म्हणती–' झाकी नयना
क्षणी पुरवितो तुझी कामना '
गुरूच्या भक्ता कसली वाण

क्षणात आला पर्वतशिखरी
गुरू सुचविती, ' धर्म आचरी '
ग्रामजन भेटति करिता स्नान

म्हणति कुणी–' का लपुनी येसी
का आम्हाला असे फसविसी ? '
जाणतो तो हे गुरुवरदान

क्षौर, स्नान करि, घेई दवणा
ये अगाया मल्लिकार्जुना
दिसे पण तिथे गुरूंचे ध्यान

स्थान पुण्य मग गुरु त्या कथिती
परत मठासी घेउनि येती
तयाउरि उसळे भक्तिउधाण

'क्षौर कशास्तव ?' पुसती सगळी
म्हणे, 'शैल्यगिरियात्रा घडली'
देइ तो प्रसाद दवणापान

हळु हळु परतुन येती यात्रिक
कथिती तंतुकयात्राकौतुक
येइ मग आश्चर्यासि उधाण

गुरुपुत्रा अप्राप्य न काही
सिद्धि सकलही गुरुच्या पायी
गुरूंचे चरण सुखाचे स्थान




## २१

श्रीगुरू रसिकराज होते. त्यांना संगीताची, कवित्वाची भारी आवड. एक नंदी नावाचा कुष्ठरोगी चंदलादेवीच्या आज्ञेवरून रोगनिवारणार्थ गाणगापुरी श्रीगुरूंच्याकडे आला. त्यांच्या कृपाशीर्वादाने त्याचे कुष्ठ गेले. किंचिन्मात्र राहिले. गुरू म्हणाले – जे कार्य प्रत्यक्ष देवता करू शकली नाही ते कार्य मनुष्य कसा करील – असा संशय ठेवून आलास म्हणून निःशेष झाले नाही. आता काही कवित्व कर म्हणजे तेही जाईल. श्रीगुरूंच्या आशीर्वादाने मंदबुद्धी नंदीने मग उत्तम कवित्व केले. त्यामुळे त्याचे शेष कुष्ठही गेले.

# दीर्घ अज्ञानतमि राहिलो वेष्टुनी

दीर्घ अज्ञानतमि राहिलो वेष्टुनी
कधि न रमलो गुरो तव सुयशगायनी !


गर्भवासात नव मास मी कष्टलो
तीव्र दुर्गंधिमधि लोळलो, पोळलो
जन्म होता नसे ज्ञान तव अर्चनी

यौवनी कामवश, धर्म मज नाठवे
धनमदे धुंदलो, रमत कांतेसवे
वृद्ध अवमानिले वृत्ति नच साधनी

वृद्धपण ये अता शक्ति नच विग्रही
रोग बहु ग्रासिती, नच घडे कर्महो
त्रिविध तापानले जळतसे निशिदिनी

तूच मातापिता, तूच गुरुदेवता
तूच सविताहि अज्ञानतम नाशिता
मजसि आधार नच अन्य तुजवाचुनी

सद्‌गुरू आज मी शरण तव पाउली
शांति दे, भक्ति दे, करि कृपासाउली
नाविका पैलतिरि ने भवाब्धीतुनी


ONKAR



# ३०

गाणगापुरात अशा अनेक नवलकथा घडत होत्या. एकदा तर दिवाळीचा सण त्यांनी निरनिराळ्या सात गावी, सात भक्तांच्या घरी एकाच वेळी उपस्थित राहून साजरा केला. त्या सर्वांची इच्छा पुरविली. शिवाय गाणगापुरी मठात तर होतेच. केवढा चमत्कार !

# वर्तली एक अलौकिक कथा

नाना लीलाधारी श्रीगुरु गाणगापुरि असता–
वर्तली एक अलौकिक कथा !

गुरू-द्वादशी महापर्वणी
सुभक्त जमले गाणगभुवनी
भक्तिभाव उसळला, यथाविधि पूजिति गुरुदैवता

एक भक्त दीपावलि सुदिनी
श्रीगुरुंना बोलावी सदनी
सात भक्त यापरी निमंत्रिति, राखिति पण गुप्तता

सप्तग्रामी सात भक्त ते
निमंत्रिती यापरी गुरूते
म्हणती स्वमनी, भाग्यवंत अम्हि, हो जीवितसांगता

सातहि ग्रामी दीपवाळीदिनी
श्रीगुरु गेले स्वभक्तसदनी
गाणगपुरिही मठी राहिले, साधिति नित्यव्रता

गुरुरायांचे सुभक्त सगळे
कार्तिकीस गाणगपुरि जमले
सात भक्त ते त्यांतच असती, तद्वृत्ति प्रमुदिता

एक सांगतो मनी हर्षुनी
करिती गुरु सण माझ्या सदनी
वस्त्र दिले मी तेच पहा हे, सिद्धी मम अंकिता

भक्त सातही यापरि वदती
अपुली वस्त्रे जना दाविती
मठवासी पण हसती, म्हणती, असत्य हे तत्त्वता

सुज्ञ एक बोलला तयाना
नच ओळखिले तुम्ही गुरूंना
ज्यांनी रचिले त्रिभुवननाटक, त्यांची ही चतुरता

करिति सकल मग मठी महोत्सव
श्रीगुरुसद्यश गाती अभिनव
गुरु आज्ञे सानंद परतती, स्मरत अलौकिक कथा

श्रीगुरु भरला मेघ सावळा
भक्तांचा तो चातकमेळा
कृपा उदक वर्षता हरपते, भक्तांची भवव्यथा



३१

आणि हा शेतात काम करणारा भाविक शेतकरी. श्रीगुरूंचा परम भक्त. गुरू त्याच्या भाविकतेने द्रवले आणि त्यांनी त्याच्या शेतात त्याला अमाप पीक दिले. असा दयेचा मेघ त्याच्यावर वळला.

# मेघ दयेचा वळला हो

मेघ दयेचा वळला हो
शेत पिकविले, शेतकऱ्याला घास सुखाचा मिळला हो !

जाता येता संगमस्थाना
शूद्र आदरे करी वंदना
मार्ग झाडिता नित्य, तयाला मार्ग सुखाचा कळला हो

असा दिनक्रम गुरू पाहती
श्रद्धा बघुनी मनी तुष्टती
म्हणती याच्या सदनावरुनी दैन्याचा ध्वज गळला हो

गुरू एकदा पुसती कृषिका
'वृथा कष्टसी माझ्यास्तव का ?'
इच्छा पुसता, शूद्र मनीचा हर्षझरा झुळझुळला हो

म्हणे–' मला नच कसली वांच्छा
अज्ञानी मी सेवक तुमचा
सुकाळ व्हावा धनधान्याचा याविण हेत न कसला हो

' तुला सांगतो गोष्ट हिताची
करी कापणी सर्व पिकाची '
शब्द गुरूंचा–छे! वदनातुन अमृतबिंदू गळला हो

श्रद्धा त्याची गुरुवचनावर
पीक कापण्या सजला सत्वर
दुःख करिति सुत–कांता म्हणती बाग सुखाचा जळला हो

तया वारिती सकल नगरजन
कुणा न मानी तो गुरुवाचुन
देइ धन्याला लिहुन भागविन ठरला तुमचा फाळा हो

कृषिकाने त्या पीक कापिले
लोक नगरिचे त्याला हसले
त्या करणीने सुत-कांतेचा व्यथित जीव वळवळला हो

पुढे होतसे प्रचंड वादळ
बहु पर्जन्ये तुडुंबले जळ
अशा अकाली वर्षावाने फुलमोहर तो गळला हो

त्या कृषिकाच्या परंतु शेती
थाटाला फरगटेच फुटती
शतगुण झाले पीक त्याप्रती, भाग्य पाहुणा वळला हो

देइ धन्याला द्विगुण खंडणी
टाकी दीना धान्य वाटुनी
स्त्रीसह लोळे श्रीगुरुचरणी, सुखसौरभ दर्वळला हो

श्रीगुरु ऐसे करुणासागर
कृपा वर्षिती निजभक्तावर
भावदलांनी, भक्तजनांनी श्रीगुरु प्रेमळ तुळिला हो



# ३२

भक्तिसुमने फुलत होती. भावगंध दरवळत होता. भक्तभृंग लोभावत होते. नाना जातींचे, नाना धर्मांचे ते भक्त !

बेदरचा यवनराजा मांडीवर उठलेल्या फोडाने घायाळ झाला. औषधींनी गुण येईना. तो पूर्वीचे दत्तावतार श्रीपाद श्रीवल्लभ यांचाच भक्तां-रजक होता. तो गाणगापुरी श्रीनरसिंह सरस्वतींच्या दर्शनासाठी आला. त्यांना शरण गेला. भववैद्य भेटल्यावर रोग कसा राहील ? गुरु कृपेने तोव्याधिमुक्त झाला.

# बेदरचा यवन नृपति लागे श्री गुरुचरणी

बेदरचा यवन नृपति लागे श्रीगुरुचरणी
सुटला भवव्याधितुनी !
पूर्वजन्मसंस्कारे श्रद्धा द्विज देवावर
स्फोटक अवचित उठला नृपतीच्या मांडीवर
शमन न हो व्याधीचे, वैद्य, औषधी करुनी
पुसता मग सुजनांना सुचविति ते मार्ग एक
दर्शन सत्पुरुषांचे नाशितसे अमित दुःख
पुण्यपुरुष असति असे पावन गाणगभुवनी
संगमासि गुरु दिसले, यतिवेषे नटलेले
विनयाने नृपतिने ते पावनपद धरिले
राहिला विनम्र पुढे नृपवर तो करजोडुनि

गुरु बघती, त्या पुसती, ‘ रे रजका अससि कुठे ’
ऐकुनि ते अमृतवच नृपस्मृतिला पंख फुटे
ढाळी आनंदाश्रू पूर्वचरित आठवुनी

‘ स्फोटक अति ताप देत दुःख हरा ’ नृप बोले
‘ का असत्य कथिसी रे ’ बोलुनिया गुरु हसले
बघता नच फोड कुठे, चकित नृपति होय मनी


नृप बोले ‘ गुरुवर्या यावे हो मम सदनी
कांता – सुत – राजविभव अवलोका निजनयनी ’
श्रीगुरूंनी वचन दिले, संतोषित हो नृमणी

नगर सकल सजवाया आज्ञा दे तो नृपाळ
शिबिकेतुन, नगरातुन, मिरवित ने गुरुकृपाळ
मंगल वाद्ये घुमती, टाकिति धन ओवाळुनि

राजपथी पायघड्या अंथरिल्या पुष्पमृदुल
पावन त्यावरति पडे पतितोद्धारक पाउल
बैसविले श्रीगुरुंना रत्नजडित सिंहासनि

पंचारति ओवाळिति सद्भावे नृपललना
पुत्र, आप्त, इष्ट सकल वंदिति श्रीगुरुचरणा
चरणावरि नृप लोळे, पूजित अश्रूसुमनी

गहिवरुनी नृप बोले, ‘ मी पापी, मज तारा ’
मेघ वदे – चुकविति प्रभु जन्ममृत्युचा फेरा
दर्वळला श्रीगुरुचा सद्यश सौरभ गगनी




# ३३

श्रीगुरूंचे अवतारकार्य आता पूर्ण झाले होते. समाजाची धर्मवासना बळावली होती. आध्यात्मिक-शक्ती वाढली होती. त्यांच्या अवतारसमाप्तीचा दिवस आता जवळ आला होता. ते जवळच्या शिष्यांना सांगत होते– 'आता लवकरच मी यात्रेला जाणार, महायात्रेला जाणार! परंतु तुम्ही कुणी दुःख करू नका. स्वधर्म विसरू नका. तुम्ही भक्तीने स्मरण केलेत, की मी तुमच्याजवळच आहे.'

लोक एकमेकांना ते वृत्त सांगू लागले. गुरुमाउली लवकरच दुरावणार म्हणून शोक करू लागले...श्रीगुरुंनी सर्वांचे सांत्वन केले. सर्वांकडे अमृतदृष्टीने पाहिले आणि मग ते शांतपणे निजानंदी निमग्न झाले. तो शांत–गंभीर प्रसंग खरोखर अवर्णनीय होय!

# गुरूंनी संपविला अवतार

चराचरातुन एकच उमटे करुण दीन उद्गार
गुरूंनी संपविला अवतार !

दत्तगुरू यतिवेषे नटुनी
संचरती जनहिता त्रिभुवनी
उपदेशातुन, आचरणातुन, बोधिति जीवनसार

सजले आसन दिव्य सुमांचे
बसती त्यावर गुरू जगाचे
सरित्-प्रवाहातून निघाले योग्यांचे आधार

REFBK-0014805
REFBK-0014805
मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
98C04

उत्तरायणी माघ सुमासी
तिथी प्रतिपदा शुभसमयासी
निजानंद सदनासि निघाले दत्तगुरू अवतार

आसन हळुहळु पुढे चालले
ध्यान गुरूचे पुसट जाहले
तेज लोपता, लक्ष गळ्यांतुन फुटे व्यथित हुंकार

भक्त सुजन नगरलोक जमती
अश्रुफुले नयनांतुन झरती
करुण रसाने गाणगपुरिचा भिजे सर्व प्राकार

तरुवेलींच्या उरी वेदना
दुःख नावरे दाहि दिशांना
शशिसूर्यांचे तेज हरपले उरि त्यांच्या अंधार

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ७३७२४ वि: काव्य
क्रमांक १९४५ नों: दि: ३।३।७२

चार फुले सरितेतुन येती
पट्ट शिष्य तो प्रसाद घेती
परस्परांना गुरुगुण कथिती, पुशीत अश्रूधार

व्यथित मनाने विकल भक्तजन
मंद पाउली येती परतुन
नवल! मठी त्या श्रीगुरु दिसती दिव्यमूर्ति साकार

दिवस मास हळुहळू चालले
शांत, स्थिर जनजीवन बनले
भाविक भक्ता घडत राहिला, अखंड साक्षात्कार!


ONKAR